महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-७०** **दिनांक:- २२/०३/२०२१**

## जबरीने सोनसाखळी चोरी करणा-या सराईत आरोपीला केले गजाआड

विरार पोलीस ठाणे हद्दीमध्ये घडलेले मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने मा.पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने दिनांक १४/०३/२०२१ रोजी ११:३० वा. च्या सुमारास विरार पोलीस ठाणे हद्दीतील गास कोपरी भागामध्ये रस्त्यावरुन पायी चालत जाण्याऱ्या महिलेच्या पाठीमागून मोटारसायलवरुन भरधाव वेगाने आलेल्या अनोळखी आरोपीने तीच्या गळ्यामध्ये असलेली सोन्याची चैन जबरीने खेचून चोरुन नेल्याबाबत विरार पोलीस ठाणे गु.र.क्र. २५४/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३९२ अन्वये दाखल गुन्हयातील आरोपीची गुन्हे करण्याची कार्यपध्दती, उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन अजय किरण शहा, वय २१ वर्षे, रा. गवारी चाळ, बरफ पाडा, विरार (पु.) या सराईत आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासा दरम्यान त्याचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्याला अटक करण्यात आली आहे.

आरोपी अटके दरम्यान करण्यात आलेल्या कौशल्यपूर्ण व तांत्रीक तपासामध्ये नमुद गुन्ह्या व्यतिरीक्त त्याचा इतर आरोपींसह विरार पोलीस ठाण्यातील खालील नमुद दाखल असलेल्या एकुण १४ जबरी चोरीच्या गुन्ह्यातील ५,२४,९५०/- रु. कि.चे १५३.६०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे आणि ५०,०००/- रुपये किमतीची गुन्हा करण्यासाठी वापरलेली होंडा शाईन मोटारसायकल असा एकुण ५,७४,९५० रुपये किमतीचा मुद्देमाल आरोपीकडून हस्तगत करण्यात आला आहे.

| अ.क्र | तपशिल |
|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ०८/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| २ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ३१/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| ३ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ५७६/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| ४ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ६४३/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३९२ |
| ५ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ६७९/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| ६ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ७०३/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| ७ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ७४९/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| ८ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ८३४/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| ९ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १०१७/२०२०, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| १० | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ५५/२१, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| ११ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ७१/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| १२ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १५०/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३९२ |
| १३ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २२५/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| १४ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २५४/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |

सदरची कामगिरी श्री. सदानंद दाते सो, पोलीस आयुक्त, श्री. एस. जयकुमार सो, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रशांत वाघुंडे सो, पोलीस उप आयुक्त, श्रीमती रेणुका बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. प्रफुल वाघ, पोलीस निरीक्षक (ॲडमीन) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उपनिरीक्षक अभिजीत टेलर, संदेश राणे, पो.हवा.सचिन लोखंडे, पो.ना.सचिन घेरे, विजय दुबळा, जगदिश मराठे, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो.शि.इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, सुमित जाधव, रवी वानखेडे, सुनिल पाटील, पवन पवार यांनी केली आहे.

Scanned with CamScanner